अंक ७ | वर्ष २३ | पृष्ठे ४४ | जुलै २०२६

# हसती दुनिया

(मराठी)



## जशी दृष्टी
## तशी सृष्टी

₹ २५/-

बालकांच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुद्धा प्रकाशित)

अंक ७ । वर्ष २३ । पृष्ठे ४४ । जुलै २०२६

पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुद्धा प्रकाशित

मुख्य संपादक
डॉ. विजय शर्मा

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

संयुक्त संपादक
अमृता बामुगडे

सजावट व चित्रे

उदय सत्यवान पांगे • राजनंदन कृ. पिंपळकर

कार्यालयाचा पत्ता

५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४

E-mail : hduniya.marathi@nirankari.org
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही.

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२ - २४१० ५७४९

हातात पेन्सिल घ्या, जरा एका जागी बसा
हसती दुनिया वाचा आणि खूप खूप हसा



हसती दुनिया (मराठी)

मुद्रक व प्रकाशक : श्री. राकेश मुटरेजा जी यांनी
संत निरंकारी मंडळ, दिल्ली - ९ करिता
एम. पी. प्रिंटर्स, बी २२०,
फेस -II , नोएडा (उ.प्र.) - २०१३०५
येथे छापून संत निरंकारी सत्संग भवन,
संत निरंकारी कॉलनी, दिल्ली- ११०००९
येथे प्रकाशित केली.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | राजेंद्र थोरात | ०२ |
| कविता | जगदीश म्हात्रे जी | ०३ |
| गोष्टींच्या गावात | भरत साळुंखे जी | ०४ |
| बुद्धीचा खाऊ | अमितेश ताम्हाणे जी | ०६ |
| मस्त मैदान | विजय बामुगडे जी | ०९ |
| चित्रकथा | भावेश खुराना जी | १० |
| अक्षरकथा | मनिषा सोरटे जी | १४ |
| आपली प्रयोगशाळा | डॉ. अक्षता पार्टे जी | १६ |
| कला आणि हस्तकला | नेहा ठवली जी | १९ |
| वाढदिवस बालमित्रांचा | - | २३ |
| जंगल मंगल | नविता आहीरे जी | २४ |
| मम्मी, पप्पा आणि गप्पा | प्रेरणा यादव जी | २६ |
| चांदण्यांच्या जगात | हर्षद धगाटे जी | २८ |
| चला फिरायला | संकलित | ३० |
| नेचर टिचर | मृणाल घोसाळकर जी | ३२ |
| टेक सिटी | विकास कदम जी | ३४ |
| फुलांसारखी माणसं | अमृता बामुगडे जी | ३६ |
| कथाविश्व | रश्मी थोरात जी | ३८ |

## संपादकीय

# दिसतं तसं असतंच, असं नाही

एका छोट्या चिमणीला झाडावर घरटं बांधायचं होतं. तिनं एका डेरेदार गुलमोहराच्या वृक्षाला विचारलं, ''दादा, मला इथं घरटं बांधायचं आहे, कृपया मला परवानगी देशील का?''

गुलमोहर म्हणाला, ''हे चिमुकले, मला क्षमा कर; पण मी तुला इथं घरटं बांधायला परवानगी देणार नाही.''

चिमणीला गुलमोहराचा खूप राग आला. ती मनातल्या मनात त्याला कोसत म्हणाली, किती अभिमानी आहे हा वृक्ष ! थोडी सद्धा दयामाया नाही आणि सौंदर्याचा केवढा गर्व! खरंच जेवढे मोठे तेवढेच खोटे! चला, एखाद्या लहानशा झाडावरच घरटं बांधू या.

त्या झाडाशेजारी एक लहानसं झाड होतं. चिमणीने त्या झाडालाही तोच प्रश्न विचारला. झाड हो म्हणालं. चिमणीने सुंदर घरटं बांधलं. पिलांना जन्म दिला. ज्या-ज्या वेळी गुलमोहराकडे तिचं लक्ष जाई त्या-त्या वेळी ती त्याच्याकडे रागानेच पाही.

एके दिवशी सोसाट्याचा वारा सुटला आणि गुलमोहराचं झाड मुळासकट मोडून पडलं. चिमणीला खूप आनंद झाला. ती गुलमोहराला म्हणाली, ''हे गर्विष्ठ वृक्षा! पाहिलंस, तुझा अभिमान कसा धुळीस मिळाला! मला घरटं बांधायला नकार दिला ना, त्याचं हे फळ तुला देवानं दिलंय.''

गुलमोहर खिन्नपणे हसला. म्हणाला, ''चिऊताई, तुला माझा राग येणं स्वाभाविक आहे; पण आता माझी ही जी अवस्था आहे ना, ती कधीही होऊ शकते हे मला आधीच ठाऊक होतं. माझी मुळं कमकुवत झाली होती. म्हणून मी तुला घरटं बांधायला नकार दिला. नाहीतर आज तुझ्या कोवळ्या पिलांची काय अवस्था झाली असती?''

गुलमोहराचे हे बोल ऐकून चिऊताईला आपल्या वागण्याचा पश्चात्ताप झाला. ती गुलमोहराची क्षमा मागत म्हणाली, ''दादा, मला क्षमा कर! तुला चुकीचं समजून सतत तुझा द्वेष करत राहिले.''

मित्रांनो, जसं दिसतं, तसं असतंच असं नाही. परिस्थिती त्यापेक्षा वेगळीही असू शकते. जीवन जगत असताना असे अनुभव आपल्याही वाट्याला येतात. अनेकदा वडीलधारी मंडळी आपल्याला हवं ते द्यायला नकार देतात, त्यामागे आपलंच हित असतं. म्हणून एखादी गोष्ट मिळाली तर आनंदच आहे आणि नाही मिळाली, तरी आनंद आहे, हे मानायला शिकलं पाहिजे. विनाकारण इतरांना दोष देत आपलंच अंत:करण दूषित का करावं?

- राजेंद्र थोरात

hduniya.marathi@nirankari.org



## किलबील कविता

असेल आपली दृष्टी तशी दिसेल सर्व सृष्टी
गुणग्राहक बनता होईल सद्गुणांची वृष्टी

फुलांकडे हसून पाहता दिसतं तेही फुललेलं
दुःखी होऊन पाहता दिसतं तेही कोमेजलेलं

प्रसन्नतेनं ऐकता वाटे पाखरांची गोड गाणी
निराश मनाने ऐकता वाटे कर्णकर्कश वाणी

निराश हताश रागानं जर पाहू आपण हे जग
तसंच दिसेल आपल्यासारखं आपल्याला हे जग

प्रेमानं अन् करुणेनं जर पाहिलं या जगाकडे
अवघी सृष्टी प्रेमानं मग पाहील आपल्याकडे

म्हणून सांगतो ठेवु या आपली दृष्टी ही सुंदर
आणि करु या आपण आपले जीवन हे सुंदर

- जगदीश म्हात्रे जी



गोष्टींच्या गावात

# राजा आणि भिकारी

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. विलासपूर नावाचं राज्य होतं.त्या राज्याचा राजा होता विक्रमसेन. त्याला नेहमी वाटायचं, की हे जग किती वाईट आहे. या जगात कुणीच सुखी नाही. सगळीकडे फक्त दु:खच पसरलेलं आहे. आपले मंत्री, सैनिक, प्रजा सगळेच वाईट आहेत. आपल्याला त्रास देण्याचा प्रयत्न करत आहेत. या अशा विचारांमुळे त्याला सतत चिंता सतावत असे आणि क्रोधही यायचा.

एके दिवशी तो वेश बदलून आपल्या राज्यात फिरायला निघाला. वाटेत त्याला एक भिकारी दिसला. त्याचे कपडे फाटलेले आणि मळकटलेले होते, त्याच्याकडे पाहून त्याच्या लाचार परिस्थितीची सहज कुणीही कल्पना करू शकेल अशी सडपातळ शरीरयष्टी होती. परंतु तो आनंदाने गाणे गात होता. राजाने त्याला विचारले , ‘‘अरे, तुझ्याकडे काहीच नाही आहे, इतकी लाचरीची परिस्थिती आहे तुझी, कित्येक दिवस तुझ्या पोटात काही अन्न गेले असेल असे वाटत नाही, तरीही तू आनंदी कसा ?’’

भिकारी वेश बदललेल्या राजाकडे पाहून स्मितहास्य करत विनम्र भावनेने म्हणाला, ‘‘महाराज, माझ्याकडे पाहायला दोन डोळे आहेत, माझे श्वास चालू आहेत, या झाड. खाली मला आसरा मिळाला आहे. थंडगार सावली मिळत आहे. माझे हातपाय व्यवस्थित

आहेत, मी जरी कमकुवत दिसत असलो तरी लाचार नाही. या क्षणी माझ्याकडे दु:खी होण्यासारखं कोणतंच कारण नाही. ईश्वराला माझी काळजी आहे. दिवसभरात कुणी न कुणी मला भाकर तुकडा देऊन जातो. मग मी दु:खी कशाला होऊ?’’

हे ऐकून राजा आश्चर्यचकित झाला. मनात विचार करु लागला, की माझ्याकडे सोनं, चांदी, महालमाडी सर्व काही सुख सुविधा आहेत, तरीही मी दु:खी आहे; परंतु या भिकाऱ्याकडे काहीच नसूनदेखील तो सुखी आणि आनंदी आहे.

आता राजाला कळून चुकलं, की सुख बाहेर नसतं, ते आपल्या मनातच असतं. आपल्या मनातील भावनाच आपल्याला जगाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन देतात. मनात निर्माण होणाऱ्या भावना नकारात्मक असतील तर हे जग आणि जगातील सर्व सुखसुविधा देखील आपल्याला दु:खदायक वाटू लागतात; परंतु जर आपण सकारात्मक दृष्टीने प्रत्येक परिस्थिती अनुभवू लागलो आणि या ईश्वर प्रभू परमात्म्याचे आभार मानून जीवन जगू लागलो तर प्रत्येक क्षण आनंदाने व्यतीत करू शकू.

म्हणूनच मित्रांनो नेहमी लक्षात ठेवा, की ईश्वराने जे जे दिलंय ते उत्तमच आहे. त्याबद्दल ईश्वराचे आभारच मानावेत.

- भरत साळुंखे जी





बुद्धिचा खाऊ

# भारतीय रेल्वेतील चिन्हे

**(Symbols in Indian Trains)**

## माहिती आणि महत्त्व

भारतीय रेल्वे ही देशातील सर्वात मोठी आणि महत्त्वाची सार्वजनिक वाहतूक प्रणाली आहे. दररोज लाखो प्रवासी आणि वस्तू या मार्गे देशभर प्रवास करतात. अशा विशाल व्यवस्थेत सुरक्षितता, सोय आणि वेळेचे पालन यासाठी अनेक चिन्हे वापरली जातात. ही चिन्हे प्रवाशांसाठी मार्गदर्शन करतात, अपघात टाळतात आणि रेल्वेच्या कामकाजाची माहिती देतात.

## १. प्लॅटफॉर्म चिन्हे




रेल्वे स्थानकांवर प्लॅटफॉर्म क्रमांक, आगमन व प्रस्थान वेळा, गाड्यांचे मार्गदर्शन करण्यासाठी चिन्हे लावलेली असतात. उदाहरणार्थ:

**PLATFORM 1/2/3** – प्रवाशांना त्यांच्या गाडीच्या योग्य प्लॅटफॉर्मची माहिती देते.

**ENTRANCE / EXIT** – प्रवेश आणि निर्गमनासाठी दिशा दाखवते.

## २. सुरक्षिततेची चिन्हे

रेल्वे सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी अनेक चिन्हे वापरली जातात.
STOP / HALT – गाडी थांबण्याचे संकेत.
NO ENTRY / DO NOT CROSS – रेल्वे ट्रॅकवर प्रवेश निषिद्ध.
Caution/ High Voltage – वीजेच्या तारांकडे दुर्लक्ष करू नका.



## ३. प्रवाशांसाठी सुविधा चिन्हे



रेल्वे प्रवाशांसाठी सोयीची चिन्हे दिली जातात.
Reserved / Unreserved Coaches - आरक्षित व अनारक्षित डबे.
Ladies / Women Coach - महिलांसाठी डबे.
Sleeper / AC / Chair Car - डब्यांचा प्रकार दर्शवणारी चिन्हे.
Clean Toilet / Washroom - स्वच्छ शौचालयाची माहिती.

## ४. पर्यटन आणि माहिती चिन्हे

प्रवाशांना मार्गदर्शन करण्यासाठी रेल्वे स्टेशनवर हॉटेल, रेस्टॉरंट, ट्रॅव्हल डेस्क, माहिती केंद्र अशा सुविधांची चिन्हे असतात. काही ठिकाणी प्रसिद्ध स्थळांचे दिशा-निर्देशक बोर्ड देखील दिसतात.



## ५. जागतिक चिन्हांचा वापर



भारतीय रेल्वेने आंतरराष्ट्रीय मानकांचे चिन्ह (ISO Symbols) वापरण्यास सुरूवात केली आहे. ज्यामुळे प्रवाशांना भाषेच्या अडचणीशिवाय माहिती समजते. उदाहरणार्थ: हॅंडिकेटेड / व्हीलचेअर उपलब्धता, नो स्मोकिंग, फायर एग्जिट अशा चिन्हांचा वापर केला जातो.

भारतीय रेल्वेची चिन्हे केवळ दिशादर्शक आणि सूचना देणारी नसून, ती सुरक्षा, सोय आणि प्रवाशांचा अनुभव सुधारण्याचे काम करतात. प्रवाशांनी या चिन्हांचे पालन केले, तर प्रवास अधिक सोयीस्कर, सुरक्षित आणि आनंददायी होतो. रेल्वे चिन्हांचा उपयोग करून आपण वेळेचे पालन, सुरक्षितता आणि सुविधा यांचा लाभ घेऊ शकतो, तसेच भारतीय रेल्वेच्या व्यवस्थापनाची प्रशंसा करू शकतो.

- अमितेश ताम्हाणे जी

# ५ फरक ओळखा





# पॅरालिम्पिक म्हणजे काय?

पॅरालिम्पिक (Paralympics) ही शारीरिक दिव्यांग खेळाडूंसाठी आयोजित केली जाणारी आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आहे. या स्पर्धा ऑलिम्पिकनंतर त्याच शहरात घेतल्या जातात. यात विविध प्रकारच्या दिव्यांगत्व असलेल्या खेळाडूंचा सहभाग असतो.

पॅरालिम्पिक आपल्याला शिकवते की —

‘शरीरातील कमतरता माणसाला थांबवत नाही, तर मनातील जिद्द त्याला विजेता बनवते.’

**भारताने पॅरालिम्पिकमध्ये अनेक महान खेळाडू दिले आहेत**

| | |
|---|---|
| सुमित अंतिल | टोकियो पॅरालिम्पिकमध्ये भालाफेकीत सुवर्णपद जिंकले आणि जागतिक विक्रम केला. |
| अवनी लेखरा | पॅरालिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणारी भारताची पहिली महिला नेमबाज. |
| देवेंद्र झाझरिया | दोन वेळा सुवर्णपदक जिंकणारा महान पॅरा खेळाडू. |
| मरियप्पन थंगावेलू | हायजम्पमध्ये सुवर्णपदक जिंकून देशाचे नाव उज्ज्वल केले. |
| भाविना पटेल | टेबल टेनिसमध्ये रौप्यपदक जिंकून इतिहास घडवला. |
| प्रमोद भगत | बॅडमिंटनमध्ये सुवर्णपदक जिंकून प्रेरणा दिली. |

पॅरालिम्पिक खेळाडूंची कथा ही संघर्ष, आत्मविश्वास आणि जिद्दीची असते. अनेक अडचणी असूनही ते कधी हार मानत नाहीत. म्हणूनच ते लाखो लोकांसाठी प्रेरणास्थान आहेत.

प्रेरणादायी संदेश :

‘ज्यांच्याकडे कारणे असतात ते थांबतात,
ज्यांच्याकडे जिद्द असते ते इतिहास घडवतात.’

# लोभी सावकार

कथा : भावेश खुराना जी

चित्रांकन : अजय कालडा जी







एके दिवशी एका मजुराने त्याच्याकडे येऊन म्हटले, ‘‘साहेब, मला माझा पगार द्या. घरासाठी रेशन आणायचे आहे.’’
सावकार रागाने म्हणाला, ‘‘कुठला पगार ? तू इथे जे खातोस आणि राहतोस, त्याचे पैसे मी कधी मागितले का ? तुला कोणताही पगार मिळणार नाही.’’
तो मनात म्हणाला, ‘जर सगळेच आपापला पगार मागू लागले, तर माझे नुकसान होईल. या कामचोरांना मी चांगलाच धडा शिकवतो.’
सावकाराने गावात दवंडी दिली, की ‘जो कोणी माझ्या एका प्रश्नाचे बरोबर उत्तर देईल, त्याला वर्षभर मोफत रेशन दिले जाईल. पण उत्तर चुकले, तर त्याला एक वर्ष माझ्याकडे विनावेतन काम करावे लागेल.’


दुसऱ्या दिवशी सर्व मजूर सावकाराच्या घरी जमले. सावकार म्हणाला, ''जर तुम्ही चुकीचं उत्तर दिलं, तर तुम्हाला एक वर्ष माझ्या शेतात मोफत काम करावं लागेल.''
त्यानंतर त्याने दोन फुलं दाखवून विचारलं, ''यापैकी खरं फूल कोणतं आहे?''
उजव्या हातातील फूल खरं आहे.
चुकीचं उत्तर!
अशा प्रकारे अनेक दिवस हा खेळ सुरु राहिला. गावातील अनेक मजूर सावकाराच्या जाळ्यात अडकले आणि विनामजूरी काम करु लागले.
एके दिवशी पंधरा वर्षांचा मोहित त्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी आपल्या वडिलांसोबत सावकाराकडे आला.
सावकारजी, जर मी हरलो, तर मी तुमचा नोकर म्हणून राहीन. पण जर मी जिंकलो, तर तुम्हाला सर्व नोकरांना मुक्त करावे लागेल.
मला मान्य आहे


सांग, यापैकी खरं फूल कोणतं आहे ?
माझ्या दृष्टीने तर दोन्ही फुलांमध्ये काहीच फरक दिसत नाही.
मी माझे उत्तर पाच तासांनी देईन.
५ तासानंतर
हे फूल खरं आहे, कारण ते कोमेजलं आहे.
मी माझा पराभव स्वीकारतो आणि सर्व नोकरांना मुक्त करतो.
तेव्हा मोहित म्हणाला, ''आपल्या दृष्टीने दोन्ही फुलं सारखीच होती. पण केवळ दृष्टी असणं पुरेसं नाही; दृष्टीसोबत समजही असणं आवश्यक आहे.''



# आरसा आणि प्रतिबिंब

एका गावात विराज आणि विवेक नावाचे दोन सख्खे भाऊ एकत्र राहत होते; परंतु दोघांच्याही वागण्या- बोलण्यात खूप फरक होता. त्यामुळे कुठल्याही गोष्टीत त्यांचे एकमत होत नसे. दोघांनी एकमताने राहावं म्हणून त्यांच्या वडिलांनी त्यांना अनेकदा समजावून सांगितले; पण उपयोग झाला नाही. योगायोगाने त्या गावात एका थोर महात्म्यांचं आगमन झालं. वडील दोघांनाही महात्म्यांच्या दर्शनासाठी घेऊन गेले. त्यांनी आपली समस्या महात्माजींच्या समोर ठेवत सांगितलं, ''माझ्या दोन्ही मुलांमध्ये एकमत व्हावं यासाठी आपण मार्गदर्शन करावे आणि आशीर्वादही द्यावा.''

महात्म्यांनी दोघांनाही जवळ बसवलं. त्यांनी प्रथम विराजला विचारलं, ''बाळ, तुझं काय म्हणणं आहे?'' विराज लगेच म्हणाला, ''महाराज! या जगात दुःखच दुःख भरलेलं आहे. सगळीकडे अन्याय, अत्याचार फसवणूक चाललेली आहे.'' बराच वेळ तो नकारात्मक भाव व्यक्त करत राहिला. मग महात्म्यांनी तोच प्रश्न विवेकला विचारला,

विवेक नम्रपणे म्हणाला,''हे जग सुंदर आहे. सगळीकडे ईश्वराची कृपा अविरत बरसत आहे.'' त्यावर विराज पटकन म्हणाला,''महाराज, विवेकला जगाची पारख नाही, त्यामुळे लोक त्याच्या स्वभावाचा गैरफायदा घेतात.''

वाद वाढू नये म्हणून महात्मा मध्येच म्हणाले, ''तुमच्या दोघांचही म्हणणं बरोबर आहे.'' विराज चकित होत म्हणाला, ''हे कसं शक्य आहे?'' महात्मा म्हणाले, ''सांगतो, हा आरसा आहे. आरशात बघा, काय दिसतं?''

दोघे म्हणाले, ''आमचंच प्रतिबिंब दिसतंय.''

महात्मा म्हणाले, ''आता जर तुम्ही सुंदर मेकअप करून, सुंदर वस्त्रं परिधान करून आरशासमोर उभे राहिलात, तर प्रतिबिंब कसं दिसेल ? यापेक्षा सुंदर दिसेल. याचा अर्थ आरशात काही दोष आहे का?.... नाही. आरसा हा तुम्ही जसे आहात, तेच रुप दाखवतो. आपलं प्रतिबिंब सुंदर दिसावं म्हणून जसं सौंदर्य धारण करावं लागेल, तसं मनाचं सौंदर्य जर वाढवलं, मनी सद्विचार धारण केले तर जगही सुंदर दिसू लागेल. अंत:करणात जे भरलेलं असतं, तेच बाहेर दिसतं. मनात कलुषित भावना असतील, संशय असेल तर सगळीच माणसं दुष्ट वाटू लागतील. अर्थात कुप्रवृत्तीचे काही लोक असतीलही; पण आपण त्यांच्या दुर्गुणांकडे न पाहता त्यांच्यामधील गुणच घ्यावेत.''

''गुरुदेव, मी जगाला दोष देत राहिलो... पण मी माझं मन बदलायला हवं होतं .'' महात्मा प्रेमाने म्हणाले, ''मुलांनो, जेव्हा अंत:करण निर्मळ होतं, तेव्हा सारी सृष्टी सुंदर भासते. कारण परमात्म्याने हे जग कुरूप बनवलेलंच नाही; आपणच आपल्या विचारांच्या धुक्याने जगाचं सौंदर्य झाकून टाकतो.'' आता विराज तक्रार करत राहण्याऐवजी कृतज्ञ राहू लागला. त्याला जाणवलं, की जग पूर्वीसारखंच आहे ; पण आता मात्र दृष्टी बदलली होती.

- मनीषा सोरटे जी

## सुडोकू

उत्तरे इतरत्र

| | | | |
|---|---|---|---|
| | २ | १ | |
| | ४ | | २ |
| | १ | | |
| ४ | ३ | | १ |

आपली प्रयोगशाळा

# चित्रकलेची आवड कशी जोपासावी?



चित्रकलेची आवड निर्माण करणे (Developing a hobby of drawing) ही केवळ उपजत कला नसून तो सरावाने विकसित होणारा एक 'स्नायूंचा सराव' (Muscle Memory) आहे. किशोरवयीन मुलांसाठी व्यक्त होण्याचे आणि तणावमुक्त होण्याचे हे एक उत्तम साधन आहे.

**चित्रकलेची आवड जोपासण्यासाठी खालील पायऱ्यांचे अनुसरण करा:**

## १. साहित्यापासून सुरुवात करा (साधे आणि सोपे)

सुरुवातीला महागड्या रंगांच्या किंवा कॅनव्हासच्या मागे धावू नका. महागडे साहित्य खराब होण्याची भीती वाटल्यामुळे आपण मुक्तपणे सराव करू शकत नाही.

गरजेचे साहित्य: एक कोरी वही (Sketchbook), साधी पेन्सिल (HB किंवा 2B) आणि एक चांगले खोडरबर.

तुमची वही 'कचरापेटी' समजा: तुमच्या स्केचबुकचे पहिले पान खराब झाले तरी चालेल, असा विचार करा. तिथे चुका करण्याची आणि रेघोट्या मारण्याची पूर्ण मुभा स्वत:ला द्या.



## २. मूलभूत आकारांचा सराव (Basic Shapes)



जगातील कोणतीही गुंतागुंतीची वस्तू (उदा. चेहरा, गाडी किंवा डोंगर) ही साध्या भौमितिक आकारांपासून बनलेली असते.

सराव: दररोज १० मिनिटे वतुर्ळ (Circle), चौरस (Square), त्रिकोण आणि दंडगोल (Cylinder) काढण्याचा सराव करा.

वस्तूंमध्ये आकार शोधा: समोर ठेवलेला पाण्याचा पेला म्हणजे एक दंडगोल आहे, हे पाहायला शिका.

## ३. निरीक्षणाची शक्ती वाढवा

सुरुवातीला आपण आपल्याला जे 'वाटतं' ते काढतो, जे 'दिसतं' ते नाही. ब्लाईंड कॉन्टूर ड्रॉइंग (Blind Contour): एखादी वस्तू (उदा. तुमचा हात) पहा आणि कागदाकडे न बघता केवळ हाताच्या कडा कागदावर उतरवण्याचा प्रयत्न करा. ते चित्र विचित्र दिसेल, पण तुमच्या डोळ्यांना आणि हाताला ताळमेळ बसवण्याचे प्रशिक्षण मिळेल.

रिकामी जागा पहा (Negative Space): खुर्ची काढण्याऐवजी, खुर्चीच्या दोन पायांमधील 'रिकामी जागा' किंवा आकार काढण्याचा प्रयत्न करा. यामुळे प्रमाणबद्धता (Proportions) सुधारते.

## ४. '१० मिनिटे' नियम पाळा

आठवड्यातून एकदा ५ तास चित्र काढण्यापेक्षा रोज १० मिनिटे काढणे जास्त प्रभावी ठरते.

टीव्ही पाहताना किंवा गाणी ऐकताना साध्या रेघोट्या किंवा 'डूडलिंग' (Doodling) करा. यामुळे हाताची लवचिकता वाढते.



## ६. विविध शैली वापरून पहा

तुम्हाला केवळ वास्तववादी (Realistic) चित्रच काढले पाहिजे असे नाही. तुम्हाला जे आवडते ते निवडा:

डूडलिंग: केवळ नक्षीकाम आणि आकृत्या.

कॅरेक्टर डिझाइन: स्वत:चे कार्टून किंवा ॲनिमे (Anime) पात्र तयार करणे.

लँडस्केप: निसर्गचित्रे किंवा आजूबाजूचा परिसर रेखाटणे.

‘मला चित्र काढता येत नाही’ या विचारावर मात कशी करावी?

प्रत्येक कलाकाराच्या आयुष्यात असा एक काळ येतो जेव्हा त्याला समजते की त्याचे चित्र हवे तसे येत नाहीये. याला ‘द गॅप’ म्हणतात. तुमच्या डोळ्यांना चांगलं चित्र काय असतं हे कळतंय, पण तुमच्या हाताला अजून ते जमत नाहीये. नेमकी हीच वेळ शिकण्याची असते. इथे हार मानू नका

- डॉ. अक्षता पार्टे जी

## जिभेची लुडबुड



- चिंचेच्या झाडाखाली चंचल चिमणी चिवचिवली.
- कच्चा पापड, पक्का पापड, कच्चा पापड, पक्का पापड.
- खडकावर खेकडा, खेकड्यावर खडा.
- चंदूच्या चुलत भावाच्या चुलत बहिणीच्या चुलत भावाचे नाव चंदू.
- ससा सशाला म्हणाला, ‘‘सशा, ससा सशासारखा ससा नाही.’’
- टपोऱ्या टपोऱ्या टपोऱ्या टपोऱ्या टोमॅटोच्या टोपल्या.
- रामराव रानात रानफुले रचत राहिले.
- पिंगळ्या पोपटाने पिवळ्या पेरूवर पाच वेळा पिसे पसरली.
- झपाट्याने झेप घेणाऱ्या झुबक्याच्या झाडावर झुलणारा झोका.
- चार चोर चोरी करून चांदीच्या चार चकत्या चोरून घेऊन गेले.

- नेहा ठवली जी



रंग भरा



दाखवलेला कागद कापून,
दिलेल्या सूचनांप्रमाणे
त्याची घडी घालून
फुलपाखरू बनवा.





# वाढदिवस बालमित्रांचा

सुंदर दृष्टीतून सुंदर सृष्टी घडवणाऱ्या,
तुम्हाला वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!



आस्था



हर्षा



वेदिका



आरुष



सुप्रित



रोहित



रोशन



अद्विका



शिवांश



## जंगल मंगल

# जगाकडे बघण्याची दृष्टी

सह्याद्रीच्या हिरव्यागार डोंगरदऱ्या घनदाट जंगलांनी नटल्या होत्या. सकाळ झाली, की पक्ष्यांची मधुर किलबिल सुरू होई. रंगीबेरंगी फुलं उमलत. थंडगार वारा मनाला आनंद देई.

जंगलातील सारे पशू-पक्षी गुण्यागोविंदाने नांदत होते. त्याच जंगलात सोनू नावाचा एक हत्ती राहत होता. तो खूप प्रेमळ होता. सर्वांच्या मदतीला धावून जाई. तो प्रत्येक गोष्टीत काहीतरी चांगलं शोधायचा. सूर्योदय झाला की ''वा! आजच्या दिवसाची सुरुवात किती सुंदर झाली!'' पाऊस पडला की आनंदाने नाचत म्हणायचा, ''पाहा बरं! झाडं-झुडुपं पाणी पिऊन कशी तृप्त झाली!''

जंगलातील सगळेच प्राणी सोनूवर खूप प्रेम करत असत. पण, त्याच जंगलात कालू नावाचा एक कोल्हाही राहत होता. तो मात्र प्रत्येक गोष्टीत नाराज असे. त्याची नेहमीच कुरकुर आणि तक्रार सुरु असे. सूर्य उगवला की किती ही उष्णता, पाऊस पडला की, शी! किती हा चिखल! उगाच पाऊस पडला! थंडगार वारा वाहू लागला तरी त्याची कुरकुर! म्हणून इतर प्राणी-पक्षी त्याच्यापासून दूरच राहात.

एके दिवशी अचानक काळेकुट्ट ढग आकाशात गर्दी करु लागले. ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडाकडाट सुरू झाला. सोसाट्याचा वारा सुटला. पशू- पक्षी घाबरून सैरावैरा पळू लागले. छोटे ससे घाबरून आपल्या बिळाकडे धाव घेत असताना अचानक काडकाड आवाज करत एक फांदी बिळाजवळ पडली. ते पाहताच सोनू मदतीसाठी धावला. त्याने आपल्या मजबूत सोंडेने पडलेल्या फांद्या दूर केल्या. छोट्या सशांना सुरक्षित जागी पोचवलं. झाडाखाली अडकलेल्या खारीच्या पिलांनाही बाहेर काढलं. सगळ्यांनी त्याला धन्यवाद दिले.

कालूची कुरकुर मात्र चालूच होती. ''हे जंगलच वाईट आहे. नेहमी काही ना काही संकट येतच असतं. त्यापेक्षा हे जंगल सोडून जाणंच योग्य आहे. मी तर चाललोय. चला, कोण कोण माझ्या सोबत येतंय?'' सर्वांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला; परंतु कालू मात्र कोणाचंही न ऐकता निघून गेला.

थोड्याच वेळात राघू आकाशातून झेप घेत खाली आला. म्हणाला, ''धावा धावा! कालूला वाचवा. ओढा पार करत असताना तो दलदलीत फसलाय.'' सारे त्याच्या मदतीला धावले. सोनूने सोंडेचा आधार देत त्याला अलगद बाहेर काढले आणि आपल्या पाठीवर बसवून आपल्या सोबत आणले.

थोड्याच वेळात ढग दूर झाले. आकाशात इंद्रधनुष्य चमकू लागलं. पुन्हा सारं वातावरण प्रसन्न झालं. कालूच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. तो म्हणाला,'' खरंच मित्रांनो! कोणतीही परिस्थिती वाईट नसते. जे जे आपल्याला आवश्यक असतं ते निसर्ग देत असतो; पण मी उगाच सर्वांनाच दोष देत राहिलो. तुमच्यासारखे मदतीला धावून येणारे मित्र असताना मी हे जंगल सोडून जाण्याचा वेडेपणा केला. मला क्षमा करा. हे जंगलच माझा स्वर्ग आहे. तुम्हाला सोडून आता मी पुन्हा कुठेही जाणार नाही.''

त्या क्षणापासूनच कालूची जगाकडे पाहण्याची दृष्टी बदलली. त्याला सगळ्या सृष्टीत आनंदच दिसू लागला.

- नविता आहिरे जी

पान नं १५ वरील सुडोकूचे उत्तर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | २ | १ | ४ |
| १ | ४ | ३ | २ |
| २ | १ | ४ | ३ |
| ४ | ३ | २ | १ |

मम्मी पप्पा आणि गप्पा



# गरज असेल, तिथं शांत न राहता अवश्य बोला

मित्रांनो,जीवन जगत असताना आपल्याला अनेकदा काही चांगली माणसंही भेटतात. त्यांच्याकडून नकळत काही चुका जरी घडल्या, तरी आपण त्यांना सहज क्षमाही करतो.

परंतु एखादी व्यक्ती आपल्याशी खूपच वाईट वागू लागली, तिचं वागणं त्रासदायक ठरू लागलं तर अशावेळी काय करायचं?...गप्प राहायचं,की त्याच्याकडे दुर्लक्ष करायचं ? की त्याला जाब विचारायचा?

अशावेळी अनेकदा दुर्लक्ष करणं योग्य ठरतं. परंतु दुर्लक्ष करुनही जर वारंवार त्या व्यक्तीकडून त्रास होऊ लागला, तर त्या व्यक्तीला जाब विचारणं किंवा त्याची वागणूक बदलण्यासाठी योग्य व्यक्तींची मदत घेणंच शहाणपणाचं ठरतं.

## असे अनुभव ओळखायचे कसे?

समजा, तुमचा मित्र तुमच्या हस्ताक्षराबद्दल तुमची चेष्टा करतो. तुम्ही हसता, तोही हसतो आणि नंतर तुम्ही दोघे ती गोष्ट विसरून नेहमीप्रमाणे एकत्र खेळता. ही मैत्रीपूर्ण चेष्टा असू शकते.

पण कल्पना करा, की एखादी व्यक्ती नेहमीच तुमची खिल्ली उडवते. तुम्हाला नावं ठेवते, चारचौघात तुम्हाला चिडवत राहते किंवा तुमच्या शरीराला नको त्या ठिकाणी वारंवार स्पर्श करते, अशा व्यक्तीच्या जवळपास राहणं जर असह्य वाटू लागतं, तेव्हा ही गोष्ट दुर्लक्ष करण्यासारखी नाही. ही चेष्टा मस्करी नसून हा छळवाद (Bullying) असू शकतो.

## ही बाब समजून घेण्यासाठी स्वत:लाच हे प्रश्न विचारा:

- त्या व्यक्तीसोबत राहताना मी मनमोकळेपणाने राहू शकतो का?
- त्या व्यक्तिविषयी मला आदर वाटतो का?
- मी त्यावेळी आनंदी असतो का ?
- माझी चेष्टा करणं थांबव, असं सांगूनही तो पुन्हा पुन्हा तीच गोष्ट करत राहतो का?
- त्याचं वागणं, डिवचणं खूप अस्वस्थ करतं का?
- त्याच्याकडून शारीरिक इजा होऊ शकते का?
- त्याचा वारंवार होणारा स्पर्श किळसवाणा वाटतो का?
- त्याने दिलेल्या त्रासाबाबत 'बाहेर कोणाला सांगायचं नाही' अशी धमकी त्याने दिली आहे का?

यापैकी कोणत्याही प्रश्नाचं उत्तर ''होय'' असेल, तर या गोष्टीकडे गांभीर्याने पाहणं गरजेचं आहे. ईश्वराने प्रत्येकाला बुद्धी आणि विवेक दिला आहे.

## आपल्या बाबतीत काहीतरी चुकीचं घडतंय हे लक्षात आल्यावर आपण काय करू शकतो?

सर्वप्रथम, घरातील वडिलधारी माणसांशी किंवा विश्वासू व्यक्तीशी या बाबतीत बोला. म्हणजेच,आपले आई-वडील, शिक्षक, शालेय समुपदेशक, आजी-आजोबा किंवा आपल्या विश्वासातील कोणतीही मोठी व्यक्ती असेल त्यांना काय घडलं ते सविस्तर सांगा.

वडिलधाऱ्यांमार्फत त्या व्यक्तीला आधी शांतपणे समजावण्याचा प्रयत्न करा. मगच पुढचे पाऊल उचला.

- प्रेरणा यादव जी,
(मानसोपचारतज्ज्ञ)



# मंगळ आणि गुरूच्या पलीकडचे गुपित- बटू ग्रह 'सेरेस'



आपण जेव्हा रात्री आकाश पाहतो, तेव्हा आपल्याला तारे आणि काही ग्रह दिसतात. पण मंगळ आणि गुरू या दोन ग्रहांच्या दरम्यान एक असा पट्टा आहे, जिथे लाखो खडक सूर्याभोवती फिरत आहेत. यालाच आपण 'ॲस्टरॉइड बेल्ट' (Asteroid Belt) म्हणतो. याच पट्ट्यात लपलेला आहे एक रहस्यमय गोल – सेरेस (Ceres)!

## १. ओळखीचा पेच: ग्रह की लघुग्रह?

१ जानेवारी १८०१ रोजी ज्युसेप्पे पियाझी यांनी सेरेसचा शोध लावला. सुरुवातीला त्याला सूर्यमालेतील आठवा ग्रह मानले गेले. पण नंतर तिथे इतरही अनेक छोटे खडक आढळल्याने त्याला 'लघुग्रह' (Asteroid) म्हटले जाऊ लागले. अखेर २००६ मध्ये खगोलशास्त्रज्ञांनी त्याची व्याख्या बदलली आणि प्लूटोप्रमाणेच सेरेसची गणना 'बटू ग्रह' (Dwarf Planet) म्हणून होऊ लागली.

## २. नासाचे 'डॉन' मिशन: रहस्याचा उलगडा

नासाने २०१५ मध्ये 'डॉन' (Dawn) नावाचे एक अंतराळयान सेरेसच्या दिशेने पाठवले. या मोहिमेमुळे मानवाला पहिल्यांदाच या बटू ग्रहाचे इतके जवळून दर्शन झाले. 'डॉन'ने पाठवलेल्या फोटोंनी शास्त्रज्ञांचे सर्व जुने अंदाज बदलून टाकले. सेरेस हा केवळ एक निर्जीव खडक नसून तो एक 'सक्रीय जग' असल्याचे सिद्ध झाले.

## ३. चमकणारे पांढरे ठिपके (The Bright Spots)

सेरेसच्या फोटोंमध्ये सर्वात जास्त लक्ष वेधून घेणारी गोष्ट म्हणजे तिथल्या 'ओकेटर क्रेटर' (Occator Crater) मध्ये दिसणारे प्रखर पांढरे ठिपके. सुरुवातीला अनेकांना वाटले, की हे परग्रहावरचे दिवे आहेत की काय? पण नासाच्या संशोधनातून असे समोर आले, की हे

ठिपके सोडियम कार्बोनेटचे (क्षार) थर आहेत. जमिनीखालून आलेले खारट पाणी पृष्ठभागावर आल्यावर वाफ होऊन उडून गेले आणि मागे हे चमकणारे क्षार उरले.

### ४. एक 'ओशन वर्ल्ड' (Ocean World)

नासाच्या डेटावरून असे समजते की सेरेसच्या पृष्ठभागाखाली सुमारे ४० किलोमीटर खोलीवर खारट पाण्याचा एक विशाल महासागर असू शकतो. शास्त्रज्ञांच्या मते, पृथ्वीवर जितके गोडे पाणी आहे, त्यापेक्षाही जास्त साठा सेरेसवर बर्फाच्या आणि पाण्याच्या स्वरूपात असू शकतो. जिथे पाणी आहे, तिथे सजीव सृष्टीची शक्यता नाकारता येत नाही, हेच विज्ञानाचे मुख्य आकर्षण आहे!

### ५. क्रायोव्होल्कॅनो: जिथे आग नाही, बर्फ ओकला जातो!

पृथ्वीवर ज्वालामुखीमधून तप्त लाव्हा बाहेर येतो. पण सेरेसवर 'क्रायोव्होल्कॅना' (Cryovolcano) आढळतात. 'अहुना मॉन्स' (Ahuna Mons) हा सेरेसवरील ४ किमी उंच पर्वत आहे, जो चिखल आणि बर्फाचा वर्षाव करतो. हा पर्वत आपल्या हिमालयातील शिखरांसारखा नसून एखाद्या पिरॅमिडसारखा दिसतो. हे दृश्य एखाद्या सायन्स-फिक्शन चित्रपटासारखेच वाटते!

### ६. सेरेसवरचे आयुष्य कसे असेल?

जर तुम्ही उद्या सेरेसवर फिरायला गेलात, तर तुम्हाला खालील गोष्टींचा अनुभव येईल:
हल्के वजन: तिथले गुरुत्वाकर्षण खूप कमी आहे. जर तुमचे वजन पृथ्वीवर ६० किलो असेल, तर तिथे तुमचे वजन फक्त २ किलो भरेल! म्हणजे तुम्ही तिथे उंच उड्या मारून सहज प्रवास करू शकाल.
वेगवान दिवस: तिथे सूर्य खूप लवकर मावळतो. एक दिवस फक्त ९ तास ४ मिनिटांचा असतो.
कडाक्याची थंडी: सूर्यापासून लांब असल्यामुळे तिथे दुपारी सुद्धा तापमान उणे ३८ अंश सेल्सिअस असते.

### ७. भविष्यातील 'स्पेस स्टेशन'

शास्त्रज्ञांच्या मते, भविष्यात जेव्हा मानव मंगळाच्याही पलीकडे प्रवास करेल, तेव्हा सेरेस हा एक महत्त्वाचा 'बेस कॅम्प' ठरू शकतो. १. पाण्याचा साठा: तिथल्या बर्फापासून पिण्याचे पाणी आणि श्वास घेण्यासाठी ऑक्सिजन तयार करता येईल. २. इंधन: पाण्याचे रेणू तोडून हायड्रोजन इंधन बनवता येईल, जे अंतराळयानांसाठी पेट्रोल पंपाचे काम करेल. ३. कमी गुरुत्वाकर्षण: इथून रॉकेट लॉंच करणे पृथ्वीच्या तुलनेत खूप सोपे आणि स्वस्त पडेल.

### ८. काही मजेशीर तथ्ये (Quick Facts):

नाव: रोमन शेतीची देवता 'सेरेस' यावरून हे नाव पडले. 'Cereal' (धान्य) हा शब्द याच नावावरून आला आहे.
चंद्र: सेरेस एवढा मोठा असूनही त्याला एकही स्वत:चा चंद्र नाही.
वातावरण: तिथे अधूनमधून पाण्याच्या वाफेचे खूप विरळ आवरण तयार होते.
सेरेस हा केवळ अंतराळातील एक खडक नाही, तर तो मानवासाठी भविष्यातील संधींचे द्वार आहे. नासाच्या संशोधनामुळे आपण या बटू ग्रहाच्या जवळ पोहोचलो आहोत, पण अजूनही तिथे अशी अनेक रहस्ये दडलेली आहेत, ज्यांचा शोध तुमची पिढी भविष्यात घेऊ शकते!

- हर्षद धगाटे जी

# लाल किल्ला

## RED FORT

भारताचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठेवा

## चला फिरायला

लाल किल्ला, दिल्लीमध्ये स्थित, भारतातील सर्वात प्रसिद्ध आणि ऐतिहासिक किल्ल्यांपैकी एक आहे. हा किल्ला मुघल सम्राट शाहजहाँ यांनी १६३८-१६४८ दरम्यान बांधला होता. लाल किल्ल्याचे बांधकाम लाल बलुआ दगडीने केले आहे, ज्यामुळे त्याला 'लाल किल्ला' असे नाव पडले.

### वास्तुकला आणि वैशिष्ट्ये

**मुख्य प्रवेशद्वार:**
लाहोरी दरवाजा, जो लाल किल्ल्याचे प्रमुख प्रवेशद्वार आहे.

**मुख्य इमारती:**
दीवान-ए-आम (सार्वजनिक सभागृह), दीवान-ए-खास (खास सभा), रानी महाल, मुमताज महाल.

**मस्जिद:**
मुघल वास्तुकलेची सुंदर नमुने असलेली मजार, जामा मस्जिद सारखी विशाल मस्जिद.

**बागा आणि तलाव:**
किल्ल्याच्या परिसरात सुंदर बागा आणि पाण्याची व्यवस्था दिसते, जी मुघलांच्या निसर्गप्रेमाचे दर्शन घडवते.



   

## ऐतिहासिक महत्त्व

लाल किल्ला मुघल साम्राज्याच्या राजकीय, लष्करी आणि सांस्कृतिक केंद्राचे प्रतीक होता. या किल्ल्यात सम्राटाचे राजवाडे, महाल, बारखांबे, मस्जिद आणि सार्वजनिक सभा स्थळे होती. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळात लाल किल्ल्याचे खूप महत्त्व होते आणि आजही गणतंत्र दिन आणि स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी पंतप्रधान लाल किल्ल्यातून देशाला संबोधित करतात.

## पर्यटन आणि अनुभव

लाल किल्ला UNESCO World Heritage Site आहे आणि देश-विदेशातील पर्यटक येथे येऊन मुघल वास्तुकला, इतिहास आणि सांस्कृतिक वारसा अनुभवतात. येथे संध्याकाळी लाईट अँड साऊंड शो आयोजित केला जातो, ज्यात किल्ल्याच्या इतिहासाची मनोरंजक मांडणी केली जाते.

---

लाल किल्ला हे केवळ वास्तुकला आणि इतिहासाचे प्रतीक नाही, तर भारताच्या स्वातंत्र्य आणि संस्कृतीच्या गौरवाचे प्रतीक देखील आहे. त्याची भव्यता, लाल बलुआ दगडांची रचना आणि मुघल स्थापत्यशैली हे प्रत्येक भेट देणाऱ्यासाठी अविस्मरणीय अनुभव देतात.

– संकलित




उत्तरे इतरत्र

अक्षरे उलट-सुलट करून स्मारक / ऐतिहासिक वास्तू ओळखा

- ल्लाकिलला
- लमजताहा
- इंगेडिटया
- मिरनाकुबतु
- नारचामिर





# सिनेरियस व्हल्चर

सिनेरियस व्हल्चर
(Cinereous Vulture –
Aegypius monachus)/ मंक व्हल्चर हा
जगातील सर्वात मोठ्या उडणाऱ्या शिकारी
पक्ष्यांपैकी एक आहे.

## शारीरिक वैशिष्ट्ये –

हा पक्षी खूप मोठा असून याची लांबी साधारणपणे ९८ ते १२० सेमी (३९-४७ इंच) असते . याचा पंखांचा विस्तार (wingspan) २.४४ ते ३.१ मीटर इतका प्रचंड असतो. नराचे वजन ६.३ ते ११.५ किलो, तर मादीचे वजन ७.५ ते १४ किलो पर्यंत असू शकते. प्रौढ पक्षाचे शरीर गडद काळ्या-तपकिरी रंगाच्या पिसांनी झाकलेले असते. उडताना हा पक्षी दुरून पूर्णपणे काळा दिसतो. याच्या डोक्यावर बारीक काळी लव (down) असते. याची चोच अत्यंत मजबूत, मोठी आणि काळी असते, जी कठीण मांस आणि स्नायू फाडण्यासाठी विकसित झालेली असते. डोळे तपकिरी रंगाचे असतात. प्रौढ पक्षांचे पाय राखाडी-निळे किंवा पांढरट-पिवळे असतात, तर लहान (Juveniles) पक्षांचे पाय गुलाबी रंगाचे असतात. याच्या मानेवर उभ्या असलेल्या पिसांमुळे एखाद्या 'मंक'ने (भिक्खूने) घातलेल्या हुडसारखा (hood) आकार तयार होतो, म्हणून याला 'मंक व्हल्चर' म्हणतात. हे पक्षी प्रामुख्याने मृत प्राण्यांचे मांस (Carrion) खातात. यामध्ये मेलेले ससे, मेंढ्या, हरणे, रानडुकरे आणि गुरेढोरे यांचा समावेश असतो. हे अन्नाच्या शोधात ७५ किमी पर्यंत उडू शकतात . यांची दृष्टी अत्यंत तीक्ष्ण असते, ज्याचा वापर ते शिकार शोधण्यासाठी करतात.

## अधिवास (Habitat) – भौगोलिक विस्तार:

हे पक्षी युरोप, मध्य पूर्व आणि आशियामध्ये आढळतात. यामध्ये स्पेन, ग्रीस, तुर्की, रशिया, उझबेकिस्तान, उत्तर भारत आणि चीन या देशांचा समावेश होतो. वास्तव्य: त्यांना डोंगराळ प्रदेश, उंच डोंगररांगा, घनदाट जंगले आणि निम-वाळवंटी भाग आवडतात. आशियामध्ये ते अधिक उंचीवर, अगदी माउंट एव्हरेस्टवर (६,९७० मीटर) देखील दिसले आहेत.

## प्रजनन (Reproduction)

हे पक्षी एकपत्नीत्व (Monogamous) पाळतात, म्हणजे ते आयुष्यभर एकाच जोडीदारासोबत राहतात. मादी वर्षातून एकदाच (फेब्रुवारी-एप्रिल दरम्यान) एक अंडे घालते. नर आणि मादी दोघेही मिळून ५० ते ६० दिवस अंडे उबवतात.

सिनेरियस व्हल्चर (Cinereous Vulture) भारतात प्रामुख्याने हिवाळ्यातील स्थलांतरित पाहुणा म्हणून आणि काही विशिष्ट भागांत स्थानिक रहिवासी म्हणून आढळतो. हे पक्षी प्रामुख्याने उत्तर भारतात (Northern India) आणि वायव्य भारतात (Northwestern India) आढळतात.
भारतातील काही भागांत हे पक्षी प्रजननही करतात. वायव्य भारतात ते फेब्रुवारी किंवा एप्रिलमध्ये, तर ईशान्य भारतात (Northeastern India) जानेवारीमध्ये प्रजनन करताना आढळले आहेत.
हिवाळ्याच्या काळात (Winter) हे पक्षी प्रामुख्याने उत्तर आणि वायव्य भारतात मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास असतात

## स्थलांतराची कारणे

सिनेरियस व्हल्चर प्रामुख्याने युरेशिया आणि मध्य आशियातील थंड प्रदेशांत आढळतात. हे पक्षी प्रामुख्याने भारताकडे स्थलांतर करतात कारण जेव्हा या उत्तर भागांत अतिशय कडक हिवाळा सुरू होतो, तेव्हा तेथील हवामान राहण्यासाठी कठीण होते. अशा परिस्थितीत, हे पक्षी दक्षिण आशियातील (विशेषत: भारत आणि पाकिस्तान) उबदार प्रदेशांकडे वळतात. हे पक्षी पूर्णपणे मृत प्राण्यांच्या मांसावर (Carrion) अवलंबून असतात. उत्तर गोलार्धात बर्फवृष्टीमुळे अन्नाचा शोध घेणे कठीण होते. अन्नाच्या शोधात हे पक्षी ७५ किमी पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त प्रवास करू शकतात. अन्नाचा तुटवडा भरून काढण्यासाठी ते भारतासारख्या प्रदेशांत स्थलांतर करतात जिथे मृत जनावरे सहज उपलब्ध होऊ शकतात. प्रौढ पक्षी अनेकदा आपल्या घरट्यांजवळच राहणे पसंत करतात, मात्र तरुण पक्षी (Juveniles) जोपर्यंत प्रजननासाठी प्रौढ (Sexually mature) होत नाहीत, तोपर्यंत ते अन्नाच्या शोधात लांब अंतरावर स्थलांतर करतात.

## स्थिती:

आंतरराष्ट्रीय स्तरावर (IUCN) या पक्ष्याला 'Near Threatened' (धोकादायक स्थितीच्याजवळ) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. यांची जागतिक लोकसंख्या साधारणपणे १५,६०० ते २१,००० प्रौढ पक्षी इतकी अंदाजित आहे. सिनेरियस व्हल्चर हे पर्यावरणातील नैसर्गिक 'साफसफाई कामगार' आहेत, कारण ते मृत शरीरांचे विघटन करून रोगांचा प्रसार रोखण्यास मदत करतात.

- मृणाल घोसाळकर जी



# चिमू आणि त्याचा 'स्मार्ट मित्र'

# गूगल लेन्स

रविवारी चिमू आपल्या आजोबांसोबत बागेत फिरत होता. तेव्हा अचानक त्याला एक खूप सुंदर जांभळ्या रंगाचे फूल दिसले. चिमूने लगेच आजोबांना विचारले, ''आजोबा, या फुलाचं नाव काय आहे?'' आजोबा हसले आणि म्हणाले, ''मला माहीत नाही रे! पण तुझ्या मोबाईलमधला 'स्मार्ट मित्र' तुला हे सांगू शकतो.''
''स्मार्ट मित्र?'' चिमूने आश्चर्याने विचारले. ''हो! त्याचं नाव आहे 'गूगल लेन्स'!''
चिमूने लगेच मोबाईल उघडला आणि गूगल लेन्स सुरू केले. त्याने गूगल लेन्सद्वारे त्या फुलाचा फोटो काढला आणि लगेच मोबाईलच्या आत एक छोटी जादुई टीम कामाला लागली! खरे तर ही जादू नव्हती, तर कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आणि संगणकीय दृष्टी (Computer Vision) चे आधुनिक तंत्रज्ञान होते! अचानक गूगल लेन्स मधून आवाज आला .ते म्हणाले, ''चिमू, जेव्हा तू फोटो काढतोस ना, तेव्हा मोबाईलचा कॅमेरा लाखो छोटे बिंदू म्हणजेच 'पिक्सेल्स' (Pixels) जमा करतो. जसं, आपण बिंदू जोडून चित्र बनवतो, तसंच हे पिक्सेल्स असतात. एका फोटोमध्ये असे लाखो पिक्सेल्स असतात. गूगल लेन्स प्रथम या पिक्सेल्सकडे बारकाईने पाहते आणि मग विचार करते, की हा कोणता रंग

आहे? आकार गोल आहे का? पाकळ्या किती आहेत? पानं कशी दिसतात? असे असंख्य प्रश्न तयार करून ते फोटोतील सुगावे (Clues) शोधते.''

चिमू लगेच म्हणाला, ''बास, एवढंच?'' ''नाही!'' असे म्हणून गूगल लेन्स पुढे सांगू लागले, ''गूगल लेन्स संपूर्ण फोटो एकाच वेळी पाहत नाही. ते त्याचे अनेक भाग करते. जसं,फुलाचा भाग, पानांचा भाग, माती, आकाश... आणि मग ठरवते, की कोणता भाग सर्वात महत्त्वाचा आहे. याला 'ऑब्जेक्ट डिटेक्शन' (Object Detection) म्हणतात.'' चिमूला ही गोष्ट समजली, तो म्हणाला, ''म्हणजेच, फोटोमध्ये नेमकी कोणती वस्तू शोधायची आहे, हे ओळखणं!''

''अगदी बरोबर!'' गूगल लेन्स म्हणाले, ''आता AI चा मेंदू जागा होतो. गूगलने जगभरातील कोट्यवधी फुलं, पक्षी, प्राणी, पुस्तकं, वस्तू आणि इमारतींचे फोटो आधीच संगणकाला दाखवलेले असतात. या प्रशिक्षणाला 'मशीन लर्निंग' (Machine Learning) म्हणतात.''गूगल लेन्स पुढे स्पष्ट करत म्हणाले, ''समजा, मांजर कशी दिसते हे समजण्यासाठी तुला १०० मांजरींचे फोटो दाखवले, तर काही दिवसांनी तू एखादी नवीन मांजरही सहज ओळखू शकशील. अगदी तसंच, संगणकालाही लाखो फोटो दाखवून प्रशिक्षण दिलं जातं.'' चिमूने विचारले, ''पण ही एवढी सगळी माहिती असते कुठे?''

गूगल लेन्स म्हणाला, ''हे सर्व गूगलच्या प्रचंड 'डेटाबेस'मध्ये (Database) असते. हा डेटाबेस म्हणजे एका विशाल डिजिटल ग्रंथालयासारखा (Library) आहे.तिथं फुलांचे, प्राण्यांचे फोटो आणि विविध भाषांमधील शब्दांची खूप मोठी माहिती साठवलेली असते.'' चिमू म्हणाला, ''ओहो! म्हणजे जसं मी मांजर ओळखू शकलो, तसंच तू त्या डेटाबेसमध्ये शोध घेतोस आणि स्क्रीनवर उत्तर दाखवतोस.'' गूगल लेन्स म्हणाले, ''अगदी बरोबर!'' तेवढ्यात स्क्रीनवर संदेश चमकला—''हे 'ब्लू स्टार फ्लॉवर' आहे.'' आणि खाली त्या फुलाची सर्व माहिती आली. चिमू खूप खूश झाला.

दुसऱ्या दिवशी चिमूच्या काकांनी जपानमधून एक खेळणे आणले; पण त्यावर सर्व सूचना जपानी भाषेत लिहिल्या होत्या. चिमूला त्यातले काहीच समजत नव्हते. पण काल गूगल लेन्सने सांगितल्याप्रमाणे त्याने लगेच ऐप उघडले. यावेळी गूगल लेन्सने कमाल केली. त्याने फोटोतील जपानी अक्षरे शोधली, ती वाचली, शब्द ओळखले आणि त्यांचे मराठीत भाषांतर केले! काही क्षणातच स्क्रीनवर मराठीत सूचना दिसू लागल्या. जणू काही एखादा भाषांतरकार (Translator) मोबाईलमध्येच बसून काम करत आहे!

मित्रांनो, चिमूमुळे आपल्याला गूगल लेन्सचे अनेक उपयोग कळले; पण या तंत्रज्ञानाच्या काही मर्यादा देखील आहेत, त्या आपण लक्षात ठेवल्या पाहिजेत. फोटो अस्पष्ट किंवा चुकीचा असल्यास उत्तर चुकीचे मिळू शकते , इंटरनेट नसेल, तर काही सुविधा काम करू शकत नाहीत, प्रत्येक उत्तर १००% अचूक असेलच असे नाही. आरोग्याविषयी किंवा इतर महत्त्वाच्या निर्णयांसाठी नेहमी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक असते.

आज चिमूसारख्या लाखो मुलांसाठी गूगल लेन्स हे एक डिजिटल शिक्षक, संशोधक आणि ज्ञानाचा खजिना बनले आहे. कॅमेऱ्याने पाहिलेली दुनिया सोप्या भाषेत समजून घेण्यास मदत करणारा हा खरोखरच एक अद्भुत 'स्मार्ट मित्र' आहे!

- विकास कदम जी



# अण्णा मणी

भारताची 'वेदर वुमन' आणि सौर ऊर्जा क्रांतीची शिल्पकार

## अण्णा मणी यांच्या प्रमुख उपलब्धी

- भारतीय हवामान विभागातील वरिष्ठ नेतृत्व
- 100+ हवामान उपकरणांची निर्मिती
- भारतातील सौर विकिरण नकाशीकरण
- ओझोन निरीक्षण उपकरणांचा विकास
- पवन ऊर्जा संशोधनाचा पाया

अण्णा मणी या भारतातील एक महान वैज्ञानिक होत्या, ज्यांनी हवामानशास्त्र आणि सौर ऊर्जा क्षेत्रात अमूल्य योगदान दिले. त्यांना 'भारताची वेदर वुमन' म्हणून ओळखले जाते. त्यांचा जन्म २३ ऑगस्ट १९१८ रोजी केरळमधील पीरमेडू येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना ज्ञानाची प्रचंड आवड होती. इतर मुलींप्रमाणे दागिने न मागता त्यांनी आपल्या वाढदिवशी 'एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका' मागितली होती, ज्यातून त्यांच्या जिज्ञासू वृत्तीची जाणीव होते.

त्यांनी बंगलोरमधील Indian Institute of Science (भारतीय विज्ञान संस्था) येथे नोबेल पारितोषिक विजेते सी व्ही रामन यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले. त्यांनी हिऱ्यांच्या आणि माणिकांच्या प्रकाशविषयक गुणधर्मांवर महत्त्वाचे संशोधन करून अनेक शोधनिबंध सादर केले. मात्र त्या काळातील नियमांमुळे त्यांना पीएच.डी. पदवी मिळाली नाही, तरीही त्यांनी आपली जिद्द सोडली नाही.

यानंतर त्या हवामानशास्त्राकडे वळल्या आणि India Meteorological Department (भारतीय हवामान खाते) मध्ये रुजू झाल्या. त्या काळात भारताला हवामान मोजण्यासाठी परदेशी उपकरणांवर अवलंबून राहावे लागत होते. पण अण्णा मणी यांनी स्वतः पुढाकार घेत भारतातच हवामानशास्त्रीय उपकरणांची निर्मिती सुरू केली. त्यांनी १०० हून अधिक उपकरणांचे आराखडे तयार करून देशाला स्वावलंबी बनवले. त्यांनी ओझोन थराचा अभ्यास करण्यासाठी उपकरणांच्या विकासातही महत्त्वाची भूमिका बजावली.

याशिवाय, त्यांनी सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा क्षेत्रातही पायाभूत काम केले. त्यांनी भारतभर सौर विकिरण मोजणारी केंद्रे उभारली आणि वाऱ्याचा वेग मोजण्यासाठी यंत्रणा बसवली. आज भारतात ज्या सौर प्रकल्प आणि पवनचक्क्या दिसतात, त्यामागे अण्णा मणी यांच्या संशोधनाचा मोठा वाटा आहे. त्यांच्या कार्यामुळे भारताने हवामानशास्त्र आणि नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात मोठी प्रगती केली.

त्या पुढे जाऊन भारतीय हवामान विभागाच्या डेप्युटी डायरेक्टर जनरल पदापर्यंत पोहोचल्या, जे त्या काळात एका महिलेसाठी मोठे यश होते. अण्णा मणी यांचा जीवनप्रवास आपल्याला शिकवतो की जिद्द, मेहनत आणि ज्ञानाची आवड असेल तर कोणतीही अडचण आपल्याला थांबवू शकत नाही. अण्णा मणी यांचा जीवनप्रवास प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी दाखवून दिले की अडचणी कितीही मोठ्या असल्या तरी जिद्द, मेहनत आणि ज्ञानाची आवड असेल तर यश मिळवता येते. विशेषत: विज्ञान क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्या एक आदर्श आहेत. आज भारतात सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि हवामानशास्त्रात जी प्रगती दिसते, त्यामागे अण्णा मणी यांच्या कार्याचा भक्कम पाया आहे.

## कालक्रम

1918 → जन्म

1940 → संशोधन कार्य

1948 → हवामान खात्यात प्रवेश

1960 → उपकरण विकास

1970 → सौर व पवन ऊर्जा संशोधन

1980 → डेप्युटी डायरेक्टर जनरल



प्रयोग करताना अण्णा मणी

**जिद्द, मेहनत आणि ज्ञानाची आवड असेल तर कोणतीही अडचण आपल्याला थांबवू शकत नाही.**

- अमृता बामुगडे जी

पान नं. ३१ वरील कोड्याचे उत्तर

- लाल किल्ला
- ताजमहाल
- इंडिया गेट
- कुतुब मिनार
- चारमिनार




# दृष्टी नाही, दृष्टिकोन बदलावा

एका गुरुकुलात काही शिष्य शिक्षण घेत होते. शिक्षण पूर्ण झाल्यावर एक शिष्य गुरुदेवांना म्हणाला,''गुरुदेव! मी तुम्हाला गुरुदक्षिणा म्हणून काय देऊ?'' गुरुदेव म्हणाले,''तुझ्या दृष्टीने अशी कोणती वस्तू आहे, जी कोणाच्याही उपयोगाची नाही, अशी व्यर्थ वस्तू मला गुरुदक्षिणा म्हणून दे.''

शिष्याने विचार केला, की अशा व्यर्थ वस्तू तर धरतीवर खूपच आहेत. आपण हव्या तितक्या वस्तू गुरुदेवांना देऊ शकतो. मग तो एकेका वस्तूबद्दल विचार करू लागला. त्याने पाहिले, की ही माती वर्षानुवर्षे रस्त्यात पडलेली आहे. हिचा काय उपयोग? त्याने थोडीशी माती घेतली. पुढे त्याला काही दगड पडलेले दिसले. तेही काही कामाचे नाहीत. म्हणून थोडे दगड घेतले. त्या वस्तू त्याने गुरुदेवांना दिल्या. गुरुदेव म्हणाले,''बाळ, धरतीवर असंख्य वनस्पती दिसतात. त्या मातीमधूनच तर उगवतात. मग मातीला व्यर्थ कसं म्हणता येईल? आणि हा दगड, याला व्यर्थ समजू नकोस. अशा दगडांमधूनच अनेक सुंदर सुंदर मूर्त्या घडवल्या जातात. मोठमोठ्या बांधकामांसाठी दगडांचाच उपयोग होतो.''

शिष्याने पुढे अनेक पर्याय सुचवले; पण सगळ्याच वस्तूंचा काही ना काही उपयोग आहेच. शिष्य म्हणाला, ''गुरुदेव! साप, विंचू यासारख्या विषारी प्राण्यांचा काय उपयोग? उलट त्यांचा तर आपल्याला त्रासच होतो.'' गुरुदेव म्हणाले, ''हे विषारी प्राणी, जमिनीतील विषारी घटक शोषून घेतात. जमीन सुपीक बनवतात. शिवाय आपल्याला अन्नातून विषबाधा झाली तर याच प्राण्यांचं विष त्यावर उपाय म्हणून वापरता येतं. म्हणून निसर्गातील कोणतीही वस्तू निरुपयोगी नाही आणि व्यर्थही नाही.'' शेवटी शिष्य निरुत्तर होत म्हणाला, ''मग गुरुदेव आपणच सांगावं, अशी कोणती वस्तू निरुपयोगी आणि व्यर्थ आहे?''

गुरुदेव म्हणाले, '' हे शिष्योत्तमा! माणसाजवळ असलेली निरुपयोगी वस्तू म्हणजे त्याचं अज्ञान आणि अहंकार.'' ''म्हणजे?'' ''हे बघ,माणूस थोडीशी विद्या किंवा कला शिकला, की स्वत:ला श्रेष्ठ समजू लागतो, इतरांना कमी लेखतो यालाच 'अहंकार' म्हणतात. अशा वेळी तो हा विचार करत नाही, की ईश्वराने आपल्याला बुद्धी दिली, सुंदर असा धडधाकट देह दिला. म्हणून तर आपण काही तरी प्राप्त करु शकलो. ते जर ईश्वरानं दिलं नसतं, तर आपण या विद्या कला प्राप्त करू शकलो असतो का? नाही ना! असा विचार जर प्रत्येक क्षणी केला तर ईश्वराने निर्माण केलेली कोणतीच गोष्ट व्यर्थ किंवा निरुपयोगी वाटणार नाही. प्रत्येक व्यक्ती आणि वस्तूंमध्ये विविधता, वेगवेगळे गुणधर्म आहेत. हीच तर ईश्वराची सुंदर देणगी आहे. म्हणून प्रत्येक गोष्टीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. तरच ईश्वराच्या प्रत्येक कलाकृतीत सौंदर्य दिसू लागेल. प्रत्येक गोष्ट अनमोल वाटू लागेल. म्हणून दृष्टी नाही, तर दृष्टिकोन बदलावा.

- रश्मी थोरात जी

## लेखकांना विनंती

**हसती दुनिया - (मराठी) सप्टेंबर महिन्यातील विषय**

**'पुस्तके - आपले मित्र'**

हसती दुनियाच्या वाचक/ लेखक/ कवी यांनी उपरोक्त विषयावर आधारित आपल्या कथा, कविता असे साहित्य दि. ८ जुलै २०२६ पूर्वी खालील ईमेल आय.डी.वर पाठवावे.

**सूचना :** वाढदिवसाचे फोटो प्रसिध्द करण्यासाठी कोणतेही शुल्क द्यावे लागत नाही.
फोटो वाढदिवसाच्या २ महिने आधी खालील ईमेल आय.डी.वर पाठवावे.

hduniya.marathi@nirankari.org

**- संपादक, हसती दुनिया**

# पोट धरून हसा

शिक्षक : सचिन, सांग बघू सर्वात वेगवान गोष्ट कोणती ?
सचिन : सुट्टीची घंटा !
शिक्षक : ती कशी काय ?
सचिन : ती वाजताच सगळी मुलं पळतात !

आई : बंड्या, अभ्यास झाला का ?
बंड्या : हो.
आई : मग पुस्तक उलटं का धरलं आहेस ?
बंड्या : रिव्हिजन करत होतो !

शिक्षक : सर्वात प्रामाणिक प्राणी कोणता ?
विद्यार्थी : सर, गाढव !
शिक्षक : तोच का ?
विद्यार्थी : कारण तो स्वतःला कधी घोडा म्हणत नाही !

आई : तुझी खोली एवढी अस्ताव्यस्त का ?
सोनाक्षी : मी शोधकार्य करत होती.
आई : कोणतं शोधकार्य ?
सोनाक्षी : मी माझी वही शोधत होती.

आई : खिडकीतून काय बघतोयस ?
समीर : भविष्य !
आई : दिसतंय ?
समीर : नाही, म्हणून बघतोय !

आई : दिपक बाहेर का पळतोयस ?
दिपक : बाहेर पाऊस पडतोय.
आई : मग ?
दिपक : मला माझी बोट पोहायला सोडायची आहे.

शिक्षक : चंद्रावर कोण राहतो ?
विद्यार्थी : चांदोमामा
शिक्षक : खरंच ?
विद्यार्थी : हो ! लहानपणापासून ऐकतोय.

वडील : छत्री घेऊन का नाही गेलास ?
रोहन : सकाळी पाऊस नव्हता.
वडील : मग ?
विद्यार्थी : पावसाने मला सांगितलं नव्हतं, की मी सकाळी येणार आहे म्हणून...

शिक्षक : बंड्या, शाळेत उशीरा का आलास ?
बंड्या : सर, रस्त्यात एक पाटी होती.
शिक्षक : कोणती ?
बंड्या : 'पुढे शाळा आहे, सावकाश जा !'

समीर : तुझा सर्वात मोठा शत्रू कोण आहे ?
अविनाश : गजराचं घड्याळ.
समीर : ते का ?
अविनाश : रोज सकाळी झोप मोडतो.

- उदय पांगे जी




## Download The App

**Sant Nirankari Mission "SNM" App**

The application is available for the iOS & Android smartphones.

Download on the App Store

ANDROID APP ON Google Play

## Scan QR code

Scan QR code to download Sant Nirankari Mission "SNM" App

For iOS Devices

For Android Devices

Registered with the Registrar of Newspapers
For India Under RNI Number - MAHMAR/2004/15105

# पत्रिका-प्रकाशन विभाग द्वारा

# प्रकाशित नियमित निरंकारी पत्रिकाएं




हिन्दी




पंजाबी




अंग्रेजी




हिन्दी




मराठी




गुजराती




कन्नड़




पंजाबी




बांग्ला




तेलुगू




नेपाली




मराठी




हिन्दी




पंजाबी




अंग्रेजी




मराठी

पत्रिका-प्रकाशन विभाग, सन्त निरंकारी मण्डल, एडमिनिस्ट्रेटिव ब्लॉक, निरंकारी सरोवर कॉम्पलेक्स, दिल्ली - 110009

Follow us: @SantNirankariMission www.nirankari.org